महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२७८३३ E-mail : jdhepune@gmail.com फॅक्स नंबर ०२०-२६०५१६३२

क्र. ससं/उशि/पुवि/आस्था/२०१८ 1363 दि. २१ /२/२०१८

परिपत्रक-

विषय- राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना,महाराष्ट्र यांनी दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजी मंत्रालयावर आयोजित करण्यात आलेल्या महामोर्चा संदर्भात करावयाची कार्यवाहीबाबत..

संदर्भ - १. सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संघटना-१५१८/प्रक्र.७३/१६-ब दि.२०/२/२०१८

२.संचालनालयाचे परिपत्रक क्र उशिसं/२०१८/संप-मंत्रालय/प्रशा-२ / २१०४ दि.२१/२/२०१८

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय संचालनालयाच्या परिपत्रकान्वये राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र यांनी राज्य सरकारी कर्मचा-यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजी मंत्रालय, मुंबई येथे महामोर्चा नेणार असल्याचे कळविले आहे. सदर महामोर्चामध्ये राज्यातील सरकारी, कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याअनुषंगाने राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती सघटना, महाराष्ट्र यांच्या दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या मोर्चाच्या दिवशी, शासकीय/निमशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व अधिपत्याखालील कार्यालयांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम क्रमांक ६ नुसार शासकीय कर्मचा-याने कोणत्याही संप-निदर्शनामध्ये सहभागी होऊ नये असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आयोजित महामोर्चात कार्यालयीन वेळेत सहभागी होणे ही शासकीय कर्मचा-यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम क्रमांक ६ चा भंग करणारी ठरेल व महामोर्चात सहभागी होणारे कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील

२. शासकीय-निमशासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत महामोर्चा मध्ये भाग घेणे ही बाब गैरवर्तणूकीची समजण्यात येईल व अशा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे शासनाच्या परिपत्रकात नमूद केले आहे ही बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. तसेच अधिकारी/कर्मचा-यांनी कार्यालयीन वेळेत महामोर्चामध्ये भाग घेऊ नये तसेच कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मोर्चा, निदर्शने, आंदोलने करण्यास प्रतिबंध राहील.

३. तसेच सदरची बाब आपल्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून महामोर्चा कालावधीत कार्यालयीन कामकाज व इतर सेवा सुरळीतपणे सुरु राहतील अशा आवश्यक उपाययोजना कराव्यात. सदरचे परिपत्रक आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून शासनाने दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक,उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रति- प्राचार्य ,सर्व अशासकीय कला, वाणिजय व विज्ञान , शिक्षणशास्त्र व विधी महाविदयालये, पुणे विभाग
प्रति- कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे/गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था,पुणे /डेक्कन कॉलेज,पुणे/टिळक म.विदयापीठ,पुणे/यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ,नाशिक
प्रति- अधिक्षक, शासकीय वसतिगृहे पुणे विभाग,/ संचालक, मा.प्र.से.पू.प्र.केंद्र, नाशिक.
प्रति- प्रस्तुत कार्यालयातील सर्व कर्मचारी

D:\establishment/office orders&circulars